एम एम आर डी ए
MMRDA

१४ सप्टेंबर, २०२२

जा.क्र. सा.वि.क./पुनर्वसनोत्तर/परवाणगी/746 /२०२२

प्रति,
वरिष्ठ प्रकल्प समन्वयक,
वर्ल्ड रिसोर्स इंडिया,
१ ला मजला, गोदरेज आणि बॉईज प्रिमायसेस,
गासवर्क लेन, लालबाग, परेल,
मुंबई - ४०००१२

विषय :- प्राधिकरणाच्या एस.व्ही. पटेल मानखुर्द येथील वसाहतीमध्ये मोकळया व राखीव जागी झाडे लावण्याची मान्यता व ना हरकत देणेबावत.

संदर्भ :- मा. उप आयुक्त (पर्यावरण) बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दिनांक ११/०७/२०२२ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, प्राधिकरणाच्या एस.व्ही. पटेल (मानखुर्द) येथील वसाहतीमध्ये आपल्या संस्थेच्या माध्यमातुन 'मुंबई क्लायमेट ॲक्शन प्लॅन' (Mumbai Climate Action Plan) या उपक्रमाच्या अंतर्गत आपली संस्था व टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स आणि युवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हिरवळीकरणाच्या कामाकरीता प्राधिकरणाच्या लल्लुभाई कंम्पाऊड, मानुखर्द येथील १) लाल मैदान, इमारत क्र. २२ च्या मागील जागा २) इमारत क्र. १८ च्या मागील जागा ३) मोकळे जागा - इमारत क्र. १२, ८ लगत असलेली मोकळी जागा ४) मोकळी जागा- इमारत क्रमांक २९ च्या पश्चिमेस असलेली मोकळी जागा ५) इमारत क्र. ५४ पश्चिमेस असलेली मोकळी जागा इ. जागांवर लोक सहभागामधुन हिरवळीकरण तसेच वृक्षरोपण करण्यात येणार असल्याचे कळविले आहे.

याबाबत प्राधिकरणाच्या भूमी शाखा व एस.आर.ए विभागाने कळविल्यानुसार अनु.क्र.१, २, ३ व ५ मध्ये नमूद भूखंड हे सदर पुनर्वसन वसाहतीच्या हद्दीमध्ये येत असून, सदर भूखंड R.G. करिता आरक्षित आहे. सदर भूखंडावरती झाडे लावण्याबाबत व हिरवळीकरण करण्याकरिता हरकत नाही. तथापी अनु.क्र.४ मध्ये नमूद भूखंडावर प्राधिकरणामार्फत इमारत क्र.आर-३० बांधण्याचे प्रस्तावित असल्यामुळे सदर मोकळया भूखंडावर इतर कोणत्याही प्रयोजनासाठी परवानगी/नाहरकत देता येणार नाही.

सदर उपक्रमामध्ये लोक सहभाग व आपल्या संस्थेमार्फत नियोजन होणार असल्याने या उपक्रमास प्राधिकरणाची हरकत नसून प्रकरणी भविष्यात उद्भवणा-या परिस्थितीसंबंधी प्राधिकरणामार्फत घेणारे निर्णय, अटी व शर्ती आपणास बंधनकारक राहील.

(उध्दव घुगे)
प्रमुख, सामाजिक विकास कक्ष
तथा अति. जिल्हाधिकारी

प्रत माहितीकरीता :-

१) समृद्धी को.ऑ.हौ.सो. असोसिएशन (मर्या.), सेक्टर ए, हिरानंदानी आकृती, मानखुर्द, मुंबई - ४०००४३.
२) संगम को.ऑ.हौ.सो. असोसिएशन (मर्या.), सेक्टर बी, एस.व्ही. पटेल, मानखुर्द, मुंबई - ४०००४३.
३) सह्याद्री को.ऑ.हौ.सो. असोसिएशन (मर्या.), सेक्टर सी, एस.व्ही. पटेल, मानखुर्द , मुंबई - ४०००४३.